


# साप्ताहिक किंमत सनियंत्रण अहवाल

## २०.०१.२०२५

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)


The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)


## १. मका (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# मका साप्ताहिक किंमती

## दि. १९ जानेवारी २०२५ अखेर : ₹ २२५० /क्विंटल






- मागील आठवड्यात नांदगाव बाजारात मक्याची किंमत रु. २२५० प्रती क्विंटल होती. गेल्या आठवड्याप्रमाणे या आठवड्यात किंमती समान आहे.
- खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. २२२५ प्रती क्विंटल आहे.
- सध्या मक्याच्या किंमती MSP पेक्षा जास्त आहेत.
- मागील आठवड्याच्या तुलनेत मक्याच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे २४.९४ % व ४१.५६ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमळनेर बाजारात मक्याची सरासरी किंमत सर्वाधिक रु. २२८१/ क्विंटल होती, तर छ. संभाजीनगर बाजारात सर्वात कमी किंमत रु. २१११/ क्विंटल होती.


**Source : Agmarknet**


## २. हरभरा


(पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# हरभऱ्याच्या साप्ताहिक किंमती

**दि. १९ जानेवारी २०२५ अखेर: रु. ६०९०/क्विंटल**




**गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी हरभरा उत्पादन कमी राहण्याची शक्यता आहे**


**सध्याच्या किमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.**


**रबी हंगाम २०२४-२५ साठी किंमान आधारभूत किंमत रु. ५६५० प्रति क्विं. आहे**


## ३. तूर (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# तुरीच्या साप्ताहिक किंमती

## दि.१९ जानेवारी २०२५ अखेर: रु. ७२७०/क्विंटल




गेल्या वर्षीच्या तुलनेत तूर उत्पादन यावर्षी सारखेच राहण्याची शक्यता आहे.


सध्याच्या किमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.


खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७५५० प्रति क्विं. आहे


## ४. सोयाबीन (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

### सोयाबीन साप्ताहिक किंमती
### दि. १९ जानेवारी २०२५ अखेर : रु. ४१६२ प्रती क्विंटल






- मागील आठवड्यात लातूर बाजारात सोयाबीनची सरासरी किंमत रु. ४१६२ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत ०.६ % घट झाली आहे.

- सोयाबीनची खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु.४८९२ प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे. सध्या लातूर बाजारात सोयाबीनच्या किंमती या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत.

-मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबींनची आवकमध्ये राष्ट्रीय पातळीवर २० टक्केनी घट झाली आहे.

- मागील आठवड्यात प्रमुख बाजारपैकी इंदोर बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु.४२०२/क्विंटल.) तर अमरावती बाजारात सरासरी किंमती रु.४०१२/क्विंटल होत्या.


Source: Agmarknet


**कापूस** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# कापसाच्या साप्ताहिक किंमती

## दि. १९ जानेवारी २०२५ अखेर : रु. ७,१९९/- क्विंटल






२०२४-२५ च्या हंगामासाठी भारताचे कापूस उत्पादन ७.४% ने कमी होऊन ३०.२ दशलक्ष गाठी होण्याचा अंदाज आहे कारण लागवडीचे क्षेत्र कमी झाले आहे आणि अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झाले आहे.

यू. एस. डी. ए. ने भारतातील उत्पादन अंदाज ३०.७२ दशलक्ष गाठीपर्यंत कमी केला आहे, ज्यामुळे पुरवठ्यावरील ताण वाढला आहे.

देशांतर्गत उत्पादनातील या घसरणीमुळे निर्यात कमी होईल आणि आयातीची गरज वाढेल अशी अपेक्षा आहे, जी मागील वर्षाच्या १.७५ दशलक्ष गाठीवरून २.५ दशलक्ष गाठीपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे.


अमेरिका आणि स्पेनमधील कपातीच्या तुलनेत चीन, ब्राझील आणि अर्जेंटिनामध्ये कापूस उत्पादन वाढण्याचा अंदाज आहे (Source – USDA)


## ५. कांदा (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# कांद्याच्या साप्ताहिक किमती

दि. १९ जानेवारी २०२५ अखेर: रु. २०७०/-क्विंटल






-कांद्याची लासलगाव बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. २०७० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतींत ५ टक्केनी घट झाली आहे.

-देशपातळीवरव राज्यात कांद्याच्या आवकमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत ३० % नी घट झाली आहे.

-मागील आठवड्यात पुणे बाजारात कांद्याच्या किंमती ( रु. २११६/क्विं.) सर्वाधिक होत्या, तर सोलापूर बाजारात कांद्याच्या किंमती रु.१६७५/क्विं. इतक्या होत्या.


Source: Agmarkent


६. **टोमॅटो** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# टोमॅटो साप्ताहिक किंमती

दि. १९ जानेवारी २०२५ अखेर : रु. ९२५/क्विंटल






- टोमॅटोच्या पुणे बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. ९२५ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत १० टक्केनी घट झाली आहे.

- देशपातळीवर मागील आठवड्याच्या तुलनेत टोमॅटोच्या आवक मध्ये ४.८ टक्केनी वाढ झाली आहे.


- प्रमुख APMC बाजारापैकी मुंबई बाजारात सर्वाधिक किंमती ( रु.१२२०/क्वि.) होत्या तर सोलापूर बाजारात सर्वात कमी किंमती ( रु.४२५/ क्वि.) होत्या.


Source: Agmarknet


७. **हळद** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

## हळदीच्या साप्ताहिक किंमती
## दि. १९ जानेवारी २०२५ अखेर : ₹ . १३,२५० / क्विंटल






- मागील आठवड्यात हिंगोली बाजारात हळदीची किंमत रु. १३२५० प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये घट झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत हळदीच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे ३०.८९ % व १८.७५ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी सांगली बाजारात हळदीची सरासरी किंमत सर्वाधिक रु. १३९०० / क्विंटल होती, तर रिसोड बाजारात सर्वात कमी किंमत रु. १२३२५ / क्विंटल होती.
- २०२४ ते २०३१ या अंदाज कालावधीत जागतिक हळदीची बाजारपेठ लक्षणीय दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
- २०२३-२४ मध्ये भारताने १.६२ लाख टन हळद निर्यात केली आहे, जी मागील वर्षी १.७० लाख टन इतकी होती.
- हळदीचे जागतिक उत्पादन दरवर्षी सुमारे ११ लाख टन आहे. जागतिक उत्पादन क्षेत्रात भारताचे ८०% योगदान आहे, त्यानंतर चीन (८%), म्यानमार (४%), नायजेरिया (३%) आणि बांगलादेश (३%) यांचा क्रमांक लागतो.
- सन २०२३-२४ मध्ये हळदीचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये महाराष्ट्र राज्य भारतामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम हे हळदीची लागवड करणारे प्रमुख जिल्हे आहेत.

(स्रोत - हळद आउटलुक - अहवाल)

**Source - Agmarknet**

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

पुढील QR कोड स्कॅन करून स्मार्ट प्रकल्पाचे मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड करा

---

अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,
सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

**फोन** : ०२०-२५६५६५७७, **टोल फ्री क्रमांक**: १८०० २१० १७७०,

**ई-मेल** : market.intelligence.smart@gmail.com

**वेबसाईट** : smart-mh.org